पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## मा. विद्यापरिषदेच्या ५० व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि.२८ जुलै, २०२२ दुपारी ४:३० वा.

मा. विद्यापरिषदेची ५० वी तातडीची बैठक गुरुवार, दि.२८ जुलै, २०२२ रोजी दुपारी ४:३० वा. मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली होती.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने सहभाग घेतलेले सदस्य खालीलप्रमाणे:

| अ. क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - मा. कुलगुरु | अध्यक्षा |
| २) | प्रा. डॉ. वि. बा. पाटील - प्रभारी प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. शं. द. नवले - प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील - प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. द. सु. तिकटे - प्र. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ६) | डॉ. वि. पां. शिखरे - प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| ७) | डॉ. सि. ना. सलवदे - प्र. सहयोगी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ८) | डॉ. स. श्या. लड्डा, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य | सदस्य |
| ९) | प्राचार्य डॉ. श्री. बा. क्षीरसागर | सदस्य |
| १०) | प्राचार्य डॉ. ब. पां. रोंगे | सदस्य |
| ११) | डॉ. ना. गो. शिंदे | सदस्य |
| १२) | डॉ. ता. ना. कोळेकर | सदस्य |
| १३) | डॉ. श. ह. गायकवाड | सदस्य |
| १४) | डॉ. शि. वि. शिंदे | सदस्य |
| १५) | डॉ. ब. हि. दामजी | सदस्य |
| १६) | प्राचार्य डॉ. सु. श्री. गोरे | सदस्य |
| १७) | डॉ. सु. कि. पवार - प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव |

: निमंत्रित :

| अ.क्र. | निमंत्रितांचे नाव |
|---|---|
| १) | डॉ. जी. एस. धवाले |
| २) | डॉ. ए. ए. गढवाल |
| ३) | डॉ. जी. एस. कांबळे |
| ४) | डॉ. आर. वाय. सोनकांबळे |

| | |
|---|---|
| ५) | डॉ. श्रीमती यु. व्ही. गव्हाणे |
| ६) | डॉ. एम. एन. जगताप |
| ७) | प्राचार्य डॉ. वि. पां. उबाळे |

स्वागत:

प्र.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष, सर्व सन्माननीय सदस्य व निमंत्रित सदस्य यांचे स्वागत केले.

अनुपस्थिती:

विद्या परिषदेच्या या बैठकीस प्रा. डॉ. श. शि. सूर्यवंशी, डॉ. स. र. गेंगजे, डॉ. सं. ना. कदम, प्राचार्य डॉ. म. सु. कदम, प्राचार्य डॉ. शि.सु. गणपूर-संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व डॉ. बि. द. पारसे या सदस्यांनी दुरध्वनीद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. तसेच प्राचार्य डॉ. चं. श्री. सुर्यवंशी, प्राचार्य श्री. प्र. माहुलीकर, श्री. प्र. त्र्यं. पाटील, प्रा. सुभाष भटनागर, डॉ. एस. पकिरीसामी, डॉ. शास्वती सेन येरम, डॉ. एस. सिवराम, प्रा. बी. एन. थोरात, श्री. सु. गो. इंगळे, डॉ. डी. आर. माने, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे, डॉ. द. व्यं. जाधव- विभागीय सहसंचालक, (तंत्र शिक्षण) पुणे, प्राचार्य डॉ. अ. ना. बारबोले, डॉ. गि. र. काशीद, डॉ. श्रीमती ॲनी जॉन, डॉ. चं. सं. चव्हाण हे व नियमित सदस्य डॉ. एम. ए. चोबदार, डॉ. श्रीमती अनधा जोशी, डॉ. एम. पी. शास्त्री, डॉ. श्रीमती एम. जे. पाटील, डॉ. बी. एस. मुळीक, डॉ. एस जी. सोनटक्के, डॉ. जी. यु. तोडकरी, डॉ. श्रीमती व्ही. एस. गवळी, डॉ. आर. बी. चिंचोलकर, डॉ. श्रीमती एन. सी. वाघमारे, डॉ. श्रीमती ए. ए. सुलाखे, डॉ. व्ही. एम. दिक्षीत, डॉ. एम. एस. मेंते, डॉ. व्ही. बी. घुटे, डॉ. जे. एस. बाजारे, डॉ. अनिल कट्टी, प्रा. आर. एल. सावलजकर, डॉ. एल. बी. दामा, प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील,डॉ. एम. डी. सातपुते, डॉ. व्ही. पी. धुळप, डॉ. आर. टी. व्यवहारे, डॉ. श्रीमती पी. एस. याळगी, डॉ. एस. के. सरसमकर, डॉ. व्ही. एस. तगेली, प्राचार्य डॉ. के. जे. कारंडे, डॉ. ए. एस. विभुते, प्रा. एल. एम. आर. जे. लोबो, प्रा. व्ही. आर. मराठे, श्रीमती एस. आर. दिपाली व डॉ. पी. एन. कोळेकर हे निमंत्रित सदस्य विद्या परिषदेच्या बैठकीस अनुपस्थित होते.

डॉ. सि. ना. सलवदे यांनी विद्यार्थ्यांकडून जादा शुल्क घेऊ नये, विद्यार्थ्यांच्या तक्रारी विद्यापीठाकडे येऊ नये इ. स्वरुपाच्या तक्रारी विद्यापीठाकडे येऊ नयेत व असे प्रकार पुन्हा घडू नयेत याची विद्यापीठाने खबरदारी घ्यावी असे मत व्यक्त केले. तसेच विद्यापीठाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे महाविद्यालयांनी पालन करावे असे मा. कुलगुरु यांनी सर्व सदस्यांना सुचित केले.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

[०१] **कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावरील एम.सी.ए. भाग-१ या नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या एका वर्षासाठी मान्यता देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम एम.सी.ए. भाग-१ सुरू करण्याबाबत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No. Western/१९३१७६७७४८२/२०२१/EOA, दि.१५/०७/२०२१ व महाराष्ट्र शासन आदेश क्रमांक. टीईएम-२०२१/प्र.क्र.(१२४/२१) तांशि-४, दि.१८/०८/२०२१ अन्वये कायम विना अनुदानित तत्वावर मान्यता दिली आहे.

Bombay High Court Civil Writ Petition No. ८७८३ of २०२१ दि.२६/०७/२०२२ च्या आदेशान्वये दि.०२/०८/२०२२ पूर्वी प्रथम संलग्निकरण देणेबाबत आदेश प्राप्त झाले आहेत.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सदर महाविद्यालयाच्या नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम एम.सी.ए. भाग-१ या अभ्यासक्रमास विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण देण्याबाबत महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करण्याकामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ व विद्यापीठ अनुदान आयोग नियमावली, २००९ नुसार खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. व्ही. पी. शिखरे | (अध्यक्ष) |
| २) | डॉ. ए. ओ. मुलाणी | (सदस्य) |
| ३) | मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई | (सदस्य) |
| ४) | श्री. सचिन देशमुख | (सदस्य) |

उक्त समितीने सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून, समितीने उक्त महाविद्यालयाच्या एम.सी.ए. भाग-१ या अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या एका वर्षाकरिता सोबत जोडल्याप्रमाणे विनाअट मान्यता देण्याची शिफारस केली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार प्रथम संलग्निकरणास मान्यता देण्याची बाब प्रथमत: विद्या परिषद बैठकीत सादर करणे आवश्यक आहे.

सबब, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावरील एम.सी.ए. भाग-१ या नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या एका वर्षासाठी मान्यता देण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर या महाविद्यालयाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील एम.सी.ए. भाग-१ या नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या एका वर्षासाठी सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरू व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून बैठक संपल्याचे प्र. कुलसचिव यांनी जाहीर केले.

28/07/22
प्र. कुलसचिव
(सदस्य सचिव, विद्या परिषद)

M. Fadnavis 28.7.22
मा. कुलगुरु
(अध्यक्ष, विद्या परिषद)